संदर्भ क्र.सुरमं/विभ/राभाआ/२०२०-१०७६.
सुरक्षा रक्षक मंडळ बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्हा
डी-३०१/इ-३०१, सानपाडा रेल्वे स्टेशन कॉम्प्लेक्स,
सानपाडा, नवी मुंबई ७०५.
दूर.०२२-२७७५१३८५/०२२-२७७५१३८६,
E-mail ID sgb_sanpada@yahoo.co.in

दिनांक : - ६ फेब्रुवारी २०२०

# आ दे श

**विषय :- सुरक्षा रक्षक मंडळातील नोंदीत सुरक्षा रक्षक/अधिकारी यांचा विशेष भत्ता/महागाई भत्ता आणि घरभाडे भत्ता यामध्ये दि. १ जानेवारी २०२० पासून करण्यांत येणारी सुधारणा.**

सुरक्षा रक्षक मंडळाने नोंदीत सुरक्षा रक्षक/अधिकारी यांचा विशेष भत्ता/महागाई भत्ता आणि घरभाडे भत्ता मंडळाच्या क्र.सुरमं/डीए/राभाआ/२०१९-४७३५, दि.१४.८.२०१९ च्या आदेशान्वये दि.१ जुलै, २०१९ पासून निर्धारीत केला होता.

सक्षम प्राधिकारी, किमान वेतन अधिनियम, १९४८ यांनी त्यांचे आदेश क्र.ग्रा.वि/किवेअ/विभ/२०२०-०१/कार्या-१०/१७८३, दि.०५.०२.२०२०, अन्वये दि.१ जानेवारी २०२० ते दि. ३० जून २०२० या कालावधीकरीतां विशेष भत्ता/महागाई भत्त्याचा दर रु.७५४.०० दरमहा निश्चित केलेला आहे. त्या अनुषंगाने मंडळाने दि. ०६.०२.२०२० रोजी निर्णय घेऊन मंडळातील नोंदीत सुरक्षा रक्षक/अधिकारी यांचा विशेष भत्ता/महागाई भत्ता दि. १ जानेवारी २०२० ते दि. ३० जून २०२० या कालावधीकरीतां रु.७५४.०० दरमहा इतका केलेला आहे.

मंडळाने नोंदीत सुरक्षा रक्षक/अधिकारी यांना किमान वेतनावर (वेतन व विशेष भत्ता/महागाई भत्ता) २०% दराने घरभाडे भत्ता लागू केलेला आहे. नोंदीत सुरक्षा रक्षक/अधिकारी यांचे प्रवास भत्ता, शैक्षणिक भत्ता, रजाकालीन प्रवास भत्ता व धुलाई भत्ता यांचे दर मंडळाने आदेश क्र.सुरमं/अध्यक्ष/२०१७-७१८८, दि.१७ ऑक्टोंबर, २०१७ अन्वये निर्गमीत केलेल्या आदेशानुसार असून त्यामध्ये कोणताही बदल केलेला नाही.

**दि.१ जानेवारी, २०२० ते दि.३० जून २०२० या कालावधीकरीतां वेतन व भत्ते यांचा तक्ता.**

| अ क्र | सुरक्षा रक्षकाचा हुद्दा | *मूळ वेतन | *विशेष भत्ता/ महागाई भत्ता | घरभाडे भत्ता | प्रवास भत्ता | शैक्षणिक भत्ता | रजा कालीन प्रवास भत्ता | धुलाई भत्ता | एकूण वेतन व भत्ते | लेव्ही (मूळ वेतनाच्या @४५.२५ %) रुपये | लेव्ही रु (घरभाडे, प्रवास व शैक्षणिक भत्त्यावर, रजाकालीन प्रवास भत्ता @ ३.२५%) | एकूण रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सुरक्षा रक्षक/ महिला सु.रक्षक | १२,०८२.०० | ७५४.०० | २,५६७.०० | १,५००.०० | १,३००.०० | १००.०० | ६००.०० | १८,९०३.०० | ५,८०८.०० | १७८.०० | २४,८८९.०० |
| २ | मुख्य सुरक्षा रक्षक | १२,३५७.०० | ७५४.०० | २,६२२.०० | १,५००.०० | १,३००.०० | १००.०० | ६००.०० | १९,२३३.०० | ५,९३३.०० | १७९.०० | २५,३४५.०० |
| ३ | सुरक्षा पर्यवेक्षक | १३,०५७.०० | ७५४.०० | २,७६२.०० | १,५००.०० | १,३००.०० | १००.०० | ६००.०० | २०,०७३.०० | ६,२४९.०० | १८४.०० | २६,५०६.०० |
| ४ | सहा.सु. अधिकारी | १३,२८२.०० | ७५४.०० | २,८०७.०० | १,५००.०० | १,३००.०० | १००.०० | ६००.०० | २०,३४३.०० | ६,३५१.०० | १८५.०० | २६,८७९.०० |
| ५ | सुरक्षा अधिकारी | १३,७३२.०० | ७५४.०० | २,८९७.०० | १,५००.०० | १,३००.०० | १००.०० | ६००.०० | २०,८८३.०० | ६,५५५.०० | १८८.०० | २७,६२६.०० |
| ६ | मुख्य सुरक्षा अधिकारी | १४,१८२.०० | ७५४.०० | २,९८७.०० | १,५००.०० | १,३००.०० | १००.०० | ६००.०० | २१,४२३.०० | ६,७५९.०० | १९१.०० | २८,३७३.०० |

***मूळ वेतन + विशेष भत्ता/महागाई भत्ता = किमान वेतन**

बृहन्मुंबई व ठाणे जिल्हयातील मुख्य मालकांनी नोंदीत सुरक्षा रक्षकांच्या किमान वेतनावर (मूळ वेतन + विशेष भत्ता = किमान वेतन) ४५.२५% दराने व घरभाडे भत्ता, प्रवास भत्ता, शैक्षणिक भत्ता, रजाकालीन प्रवास भत्ता व अतिकालीक कामाचा भत्ता यावर ३.२५% दराने लेव्ही देणे बंधनकारक राहील.

नोंदीत सुरक्षा रक्षकांच्या अतिकालीक कामाचा मोबदला किमान वेतनाच्या (मूळ वेतन + विशेष भत्ता/महागाई भत्ता) दुप्पट दराने देय राहील. सर्व नोंदीत मुख्य मालकांना याद्वारे सूचित करण्यांत येते की, त्यांनी नोंदीत सुरक्षा रक्षक/अधिकारी यांचे दि.१ जानेवारी २०२० पासून वेतन, भत्ते व त्यावरील लेव्ही सुधारीत दराप्रमाणे मंडळाकडे जमा करावी.

Security Guards Board For Br. Bombay & Thane District
Sanpada
Navi Mumbai

सही/-
**अध्यक्ष**
**सुरक्षा रक्षक मंडळ**
**बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्हा**

**प्रत पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना :**
**प्रति,**
**मे. ............................................, नों.क्र. ........, युनिट क्र. ........**
**..................................................................**

***This being a computerised printed copy, signature is not required.***